
।। जय भवानी ।।     ।। ॐ ।।     ।। जय शिवराय ।।

स्थापना १९९१ )     (नोंदणी क्र. : अेफ / ३४५१ ठाणे

# रत्नागिरी जिल्हा मराठा सेवा संघ

प्रस्तावित : कोकण विकास मराठा सेवा संघ

कुलस्वामिनी श्री तुळजाभवानी माता मंदिर, से. ८ (अ), भुखंड क्र. ९५, प्रतिक कॉर्नरच्या बाजुला, ऐरोली, नवी मुंबई







श्री. / श्रीमती ______________________________

______________________________ यांस

## सस्नेह निमंत्रण

सप्रेम नमस्कार,

**एक सुवर्ण दिवस आपल्या भाग्यास येत असून आपणांस आमंत्रित करण्यास अत्यंत आनंद होत आहे,**

संघाच्या ध्येय धोरणानुसार तसेच समाजातील सभासद व गोरगरीब दिनदुबळ्या लोकांची सेवा व्हावी यासाठी **मंदिर उभारणीबरोबर समाजभवनाची वास्तू उभारण्यात** यावी हा मोठा संकल्प घेतला होता त्या अनुषंगाने संघाच्या सर्व सभासद व कार्यकारणीने मोठ्या विश्वासाने सदर जागेवर महाराष्ट्र **कुळस्वामिनी आई तुळजाभवानीच्या मंदिराची उभारणी करण्यास सुरुवात केली, आज एक स्वप्नपूर्ण झाले.**

**आई तुळजाभवानीच्या मंदिराचे उद्घाटन, आई तुळजाभवानीच्या मूर्तीची तसेच राजे छत्रपती शिवाजी महाराज सिंहासनाधिशरुपी मूर्तीची प्राणप्रतिष्ठापना, कळशारोहण व धार्मिक विधीवत पूजेने, मोठ्या भक्तीभावात गुरुवार दि. २१ ते सोमवार दि. २५ एप्रिल २०२२ रोजी संपन्न होणार आहे. या भव्यदिव्य सोहळ्याचा साक्षीदार होण्यासाठी आपण सर्वजण सहकुटूंब, सहपरिवार उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी, हेच आपणांस आग्रहाचे आमंत्रण देत आहोत.**

आपले नम्र

## रत्नागिरी जिल्हा मराठा सेवा संघ

प्रस्तावित : कोकण विकास मराठा सेवा संघ

| | | | |
|---|---|---|---|
| श्री. कमलाकर दादा कदम | ॲड. सौ. संध्या सावंत | श्री. उमेश चव्हाण | श्री. अशोक तावडे |
| अध्यक्ष | उपाध्यक्ष | सचिव | खजिनदार |
| ९८२०५६३२७४ | ९८२१४८६९८६ | ७०२१३७६३८६ | ९९६७९२१५०९ |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| श्री. मनोहर भोसले | श्री. सुदेश शिर्के | सौ. स्वाती देसाई | श्री. संजय दरेकर | श्री. विजय साळवी | श्री. महेश सकपाळ | श्री. मंगेश महाडिक |
| सहसचिव | सहखजिनदार | सदस्य | सदस्य | सदस्य | सदस्य | सदस्य |
| ७९७७६९१८३५ | ९८९२७४८२२६ | ९३२२३६६२०३ | ८१०४०९५४२६ | ९३२६०८९३६८ | ९८२१७६६७४० | ९८२०४८०१२२ |

E-mail : rjmssnavimum@gmail.com     Website : www.rjmss.in

# -: कार्यक्रम पत्रिका :-

| दिनांक | वेळ | कार्यक्रम |
|---|---|---|
| गुरुवार, दि. २१ एप्रिल | सायं. ४ ते ७ | मूर्ती मिरवणुक - प्रारंभ : सिद्धीविनायक मंदीर से. ५, ऐरोली |
| शुक्रवार, दि. २२ एप्रिल | सकाळी | मुर्ती धान्यात ठेवणे |
| | रात्री ८ ते ९.३० | सुस्वर भजन : श्री करलकर बुवा घणसोली |
| शनिवार, दि. २३ एप्रिल | सकाळी ८ ते दुपारी २ | गणेशपूजन, पुण्याहवाचन, मातृका पूजन, नांदी श्राद्ध, मुर्ती शुद्धीकरण |
| | सायं. ६ ते ७.३० | विविध पुजन |
| | रात्रौ ८ते ९.३० | किर्तन : ह.भ.प. श्री दिगंबर महाराज नरवडे, आळंदी |
| रविवार दि. २४ एप्रिल | सका. ८ ते दु. २ | वास्तुदेवता, मुख्य देवता हवन आदि विहित कर्म |
| | रात्रौ. ८ ते ९.३० | सुस्वर भजन : श्री. गावडे बुवा से. १० ऐरोली |
| सोमवार दि. २५ एप्रिल | सकाळी ८ ते १० | श्री भवानीमाता प्राणप्रतिष्ठापना व कळशारोहण परमपुजनिय श्री वल्लभानंद सरस्वती स्वामी महाराज (गाणगापुर) यांचे हस्ते होईल तसेच त्यानंतर बलिदान, पुर्णाहुती, देवीची महापुजा, महाआरती, महाप्रसाद, अभिषेक |
| | सायं. ७ वा. | आरती |
| | सायं. ७.३० ते १० | विविध मान्यवरांचा सत्कार |
| | रात्रौ. ८ ते १० | महाप्रसाद |

# मनोगत

सर्व रत्नागिरी जिल्हा मराठा सेवा संघाचे
ज्ञाती बांधव, सगेसोयरे / भाविकजन,
यांसी सप्रेम नमस्कार,

**रत्नागिरी जिल्हा मराठा सेवा संघाच्या कार्यकारिणीच्या वतीने आज मनोगत मांडताना खूप आनंद होत आहे. आपल्या संघाची स्थापना १९९१ साली आपल्या सभासदांनी केली,** त्यावेळेची त्यांची भावना लक्षात घेता मुंबई शहर, उपनगर व ठाणे जिल्हा येथे जो काही आपला कोकणस्थ मराठा समाज आहे, तो एकत्र येऊन

**शिवरायांनी घालू दिलेली, उच्च मराठा तत्वे जपतो, तो मराठा**

**तुकोबांनी मांडलेली, उच्च मराठा तत्वे जो जगतो, तो मराठा**

**महात्मा फुले, राजश्री शाहू महाराज, गायकवाड राजे यांनी दाखवलेल्या मार्गाने चालतो, तो मराठा...**

**मराठा म्हणजे जो सत्यासाठी, न्यायासाठी, सभ्यतेसाठी व मानवतेसाठी इत्यादी उच्च मानवी तत्वज्ञानासाठी जगतो ... लढतो, तो मराठा.**

**या प्रेरणेने समाजातील कला-क्रिडा-सांस्कृतिक व सामाजिक या ध्येयाने समाजाच्या विकासासाठी स्थापन केलेला संघ म्हणजेच आपला रत्नागिरी जिल्हा मराठा सेवा संघ (प्रस्तावित कोकण विकास मराठा सेवा संघ) ऐरोली नवीमुंबई. सदर संघाच्या जडणघडणीत आजीव माजी पदाधिकारी, कार्यकारणी सदस्य व सभासद बंधुभगिनी तसेच हितचिंतक, देणगीदार या सर्वांचे मोठे योगदान आहे. म्हणूनच आपला संघ आज मोठा वटवृक्ष झालेला आहे. यासाठी सर्वप्रथम सर्वांचे त्रिवार अभिवादन करतो.**

**आपल्या सर्वांच्या सहकार्याने सिडको प्रधिकरणाच्या माध्यमातून मंदिर बांधकामासाठी प्लॉट नं. १५, ऐरोली सेक्टर ८ अ येथे संघाच्या सभासद, हितचिंतक, देणगीदार, भाविक व तत्कालिन अध्यक्ष श्री. विकास महाडिक व त्यांच्या कार्यकारणीने केलेल्या कामामुळे सिडकोकडून भूखंड विकत घेण्यात आला.**

संघाच्या ध्येय धोरणानुसार तसेच समाजातील सभासद व गोरगरिब दिनदुबळ्या लोकांची सेवा व्हावी यासाठी मंदिर उभारणीबरोबर समाजभवनाची वास्तू उभारण्यात यावी हा **मोठा संकल्प तत्कालीन अध्यक्ष श्री. तुकाराम (आबा) आंब्रे, स्वर्गीय श्री. धनंजय भोसले व त्यांच्या कार्यकारिणीने हाती घेतला आणि सन २०१९ मध्ये चैत्र शारदीय नवरात्रीच्या उत्सवामध्ये पहिल्या माळेला म्हणजेच दि. २९ सप्टेंबर २०१९ रोजी प्रत्यक्ष कामास सुरुवात होऊन, पहिला स्लॅब पूर्णत्वास झाला.**

**महाराष्ट्राच्या या पवित्र भूमीमध्ये सांस्कृतिक आणि धार्मिक परंपरेमध्ये कुलदेवतेला अनन्य साधारण महत्व आहे.** हिंदूच्या देवदेवता अनेक असल्यातरी आपल्या महाराष्ट्राची व राजे श्री छत्रपती शिवाजी महाराजांची कुळस्वामिनी म्हणून आई तुळजाभवानी माता ओळखली जाते. आई तुळजाभवानी माता क्षात्रतेजाची स्फूर्ती देवता, प्रेरणाशक्ती असून नवसाला व संकटाला धावून येणारी अशी आई भवानी मातेची ख्याती आहे.

म्हणूनच माझ्या कार्यकारिणीने जुलै २०२१ रोजी पदभार स्विकारुन अवघ्या काही महिन्यातच **मोठ्या विश्वासाने सदर जागेवर महाराष्ट्राची कुळस्वामिनी आई तुळजाभवानीच्या हेमांडपथी शैलीतील सुबक पाषाणी मंदिराची उभारणी करण्यास सुरुवात केली. जसे प्रभू श्री रामांचे मंदिर आयोध्येमध्ये कोट्यावधी भाविकांच्या श्रद्धेतून साकार होत आहे. त्याच धर्तीवर आई तुळजाभवानीच्या वास्तूची उभारणी हजारो लाखोंच्या हाताने झाली तरच ती लोकदेवता होऊन देवत्वाची निर्मिती अनुभूती होते असे म्हटले जाते.** या सर्व प्रेरणेने आपल्या सर्व सभासद, हितचिंतक, भाविक, देणगीदार व कार्यकारणी यांच्या मोलाच्या सहकार्याने संघानी वेगवेगळ्या योजना राबवून म्हणजेच **सुवर्णदान, शिलादान, मूर्तीदान, देवालयासाठी लागणारी भांडी** इत्यादींच्या माध्यमातून निधी गोळा करुन आई तुळजाभवानीचे हेमांडपथी शैलीतील सूबक पाषाणी मंदिराची उभारणी करण्यात आली आहे. यासाठी तळागाळातील सर्व सक्रीय सभासद, आजी-माजी पदाधिकारी, कार्यकारणीसदस्य, भाविक, हितचिंतक व देणगीदार या सर्वांचे पुन:श एकदा सहाकार्य केल्याबद्दल आभार मानतो.

**एक सुवर्ण दिवस आपल्या भाग्यास येत असून आपणांस कळविण्यात अत्यंत आनंद होत आहे की, आई तुळजाभवानीच्या मूर्तीची व राजे छत्रपती शिवाजी महाराज सिंहासनरुपी मूर्तीची प्राणप्रतिष्ठापना, कळशारोहण व मंदिराचे उद्घाटन धार्मिक विधीवर पूजेने व मोठ्या भक्तीभावात गुरुवार दि. २१ ते सोमवार दि. २५ एप्रिल २०२२ या कालावधीत होत आहे, या करिता संघाच्या वतीने सर्व सभासद, हितचिंतक, देणगीदार व भाविक यांना आवाहन करण्यात येते की, या भव्यदिव्य सोहळ्यासाठी आपण सर्वजण सहकुटूंब व सहपरिवार उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी, हेच आपणांस आग्रहाचे आमंत्रण देत आहोत.**

**आपले नम्र, रत्नागिरी जिल्हा मराठा सेवा संघ**